सन २०१८-१९ पीआयपी मंजुर अनुदानातून राज्यात आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता आवश्यक फर्निचरची एकत्रित खरेदी निविदा प्रक्रियेद्वारे करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०११९/प्र.क्र.०८/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २५ मार्च, २०१९.

वाचा :-

१. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील पत्र क्र . राआसो/HWCPHC/८६३२१-३२३/१८, दिनांक २६.१२.२०१८.
२. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र दिनांक २६.०२.२०१९.
३. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र दिनांक २८.०२.२०१९.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या आयुष्यमान भारत या प्रकल्पातंर्गत व्यापक प्राथमिक आरोग्य सेवा देण्यासाठी राज्यात आरोग्यवर्धिनी केंद्रे सुरु करण्यात येत आहेत. यासाठी राज्यात टप्प्याटप्प्याने १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच १०,६६८ उपकेंद्र आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रुपांतरित होणार आहेत. सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रावर शासनाच्या निर्देशाप्रमाणे BAMS पदवी धारकांना कम्युनिटी हेल्थ ऑफिसर म्हणून नेमणूक व सर्व आरोग्य केंद्रांचे पायाभूत सुविधा बळकटीकरण करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सदर आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता आवश्यक फर्निचर एकत्रितपणे खरेदीकरीता प्रशासकिय मान्यता मिळणेबाबतची बाब विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील प्रस्तावानूसार आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता आवश्यक फर्निचर खरेदीसाठी

सन २०१८-१९ च्या पीआयपीमध्ये लेखाशिर्ष FMR Code ५.१.१.२.h Infrastructure strengthening of SC to H & WC या बाबीखाली उपलब्ध असलेल्या रु.६६०७.४० लक्ष इतक्या अनुदानातून रक्कम रु.३५३८.२७ लक्ष रकमेच्या आवश्यक फर्निचरची निविदा प्रक्रियेने एकत्रित खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदरील खरेदीसाठी होणारा खर्च सन २०१८-१९ च्या कार्यक्रमाच्या मंजुर कृती आराखडयामध्ये पीआयपी अंतर्गत लेखाशिर्ष FMR Code ५.१.१.२.h या बाबीखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

अ) मंजुर अनुदानाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.:-

Sr. no	FMR Code	Name of Head	Approved Budget in PIP in 2018-19 (In Lakhs)	Proposal for Procurement (In Lakhs)
1	5.1.1.2.h	Infrastructure strengthening of SC to H & WC	6607.40	3538.27

ब) प्रस्तावित खरेदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

Sr.no.	Furniture	Qty. required/ centre		Specification	Approx. unit cost with excluding GST (in Rs.)	Approx. cost for 2504 SCs (Rs. in lakhs)	Approx. cost for 287 PHCs (Rs. in lakhs)	Approx. total cost(Rs. In lakhs
		SC HWC	PHC HWC					
1	Chairs	2	4	chair with arms and Polythene cane seat and backrest without castors. -Frame type: candiever, -Wood used in polythene cane chair: hot pressed board, -Material of Fabric Back Cover: leatherite, -Thickness of Plywood used in:12mm, -Frame material: SS 304 , -Material of fabric of seat cover: leather foam, -Thickness of plywood used in seat (mm):12mm, - Arm material: CRCA pipe with PU -Thickness of polyurethane Foam used in Backrest:25mm, -Thickness of Polyurethane Foam used in seat : 15mm. -Chair Height(mm):700mm -Seat Depth(mm): 350mm -Seat Width(mm): 350mm	5568	278.85	63.92	342.77

2	Office Chair	1	0	Knee tilt synchronic chair with arms and Ergonomic Seat Design with Push Back and separate adjustable headrest with fixed seat type and integrated Lumbar support, -Height Adjustment: up to 100mm, -Type of backrest support: backrest symmetrical lumbar support, -Arm type: fixed, -Pedestal base of glass fibre Nylon with ABS/Nylon Twin Caster wheels Minimum 5 nos. of 50mm size, -Arm material:aluminium covered with PU, -Seat material: PU Foam Covered with pure leatherite, -Material of Fabric Back Cover:Leatherite, -Material of Fabric of seat cover: Leatherite, -Overall Chair Height:1140mm, -Backrest Height:730mm -Backrest width:520mm, -Seat Height:480mm, -Seat width:520mm, -Seat depth:460mm	9206	230.52	0.00	230.52
3	Office Table	1	0	-Staff Tables with table top and verticle supports in 19 mm marine plywood finished with 1.5 mm decorative laminate confirming to I.S. 2046 (regular type). -Size of Table is 1.20x 0.60 x 0.75m. Table will have one drawer with telescopic chanels and lock, one cabinate with shutter and lock All the cut edges will be covered by first quality TW beeding.- All Internal surfaces will be finished with 0.8mm white laminate etc.	16765	419.80	0.00	419.80
4	Examination table with footstep	1	0	-Examination Couch of Size (mm): 1830 L X 500 W X 820 H Three Drawers Three Cabinets with separate doors Stainless Steel body waterproof mattress step stool with foot step having capacity of minimum weight 100 Kg etc.	25700	643.53	0.00	643.53
5	Steel Almirah / Cupboard/storage chests	1	2	-Staff Lockers of size(mm) 900x550x2000 with 0.8mm (19 gauge) M S CRC Sheet and shutters with locks and keys of 3 sets with sheet moulding 12 compartments and automotive paint all over weighing 75 kg approx.	10135	253.78	58.17	311.96

6	Stainless steel stool	1	0	-Patient seating stool of standard size made of stainless steel 25 mm. X 25 mm. square pipe 2.09 mm thick weighing 3.38 Kg. per mtr. Length framing and 2 mm thick S.S. sheet on top	1500	37.56	0.00	37.56
7	Lab table	1	0	-Lab Table of Size (mm): 2430 L X 600 W X 900 HThree Drawers Three Cabinets with separate doors Stainless Steel body with stainless steel table top sink having 600X450mm at right/left side with necessary arrangements of plumbing tap etc.	28900	723.66	0.00	723.66
8	Benches for patient waiting area	2	4	-Bench for patient waiting area of Size (mm): 1800 L x 600 W x 450 H Stainless Steel body and perforated sheet for sitting with steel arm rest.	7300	365.58	83.80	449.39
				Total		2953.27	205.90	3159.17
				12% GST				379.10
				Grand Total				3538.27

उपरोक्त तक्त्यातील आवश्यक फर्निचरच्या एकत्रित खरेदीस प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर औषधी व साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू उपकरणे व साहित्य सामुग्रीचे (Consumables) विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत

आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्य आरोग्य सोसायटीकडून सन २०१८-१९ साठी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून लेखाशिर्ष FMR Code 5.1.1.2.h Infrastructure strengthening of SC to H & WC या घटकातून भागविण्यात यावा. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903161712089717 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH
MADHUKAR
FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69,
postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI,
serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783,
ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.25 10:59:31 +05'30'

(निलेश फाळके)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सहसंचालक (असंसर्गजन्य रोग), आरोग्य सेवा, मुंबई.
५)सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
६) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
७) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
८) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
९) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
१०) निवडनस्ती (आरोग्य-७)